**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.1** **Sept-Oct 2023**

# बिगर शासकीय संघटनाची भूमिका

**श्री पांडुरंग पंडीत पाटील**
मु.जैताळ,पो.कांडगाव ता.करवीर,जि. कोल्हापूर
**Corresponding Author – श्री पांडुरंग पंडीत पाटील**
**Email:** pandurangp91@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13990800**

**प्रस्तावना :**

बिगर शासकीय संघटना ही एक खाजगी संस्था आहे जी लोकांचे दुःख दूर करण्यासाठी, गरिबांच्या हितसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, मूलभूत सामाजिक सेवा प्रदान करण्यासाठी किंवा समुदायाचा विकास करण्यासाठी उपक्रम राबवते. ते ना-नफा नसतात, म्हणजेच ते त्यांचे मालक आणि संचालकांमध्ये नफा वाटून घेत नाहीत परंतु त्यांना मिळालेला नफा संस्थेमध्येच गुंतवावा लागतो. ते काही सार्वजनिक हेतूसाठी आहेत. अलिकडच्या काळामध्ये बिगर शासकीय संघटना या नागरी समाजाचा अविभाज्य घटक बनल्या असून शासनाची मदत न घेता किंवा कमीत कमी मदत घेऊन विकास करण्यावर ही संघटना काम करीत असतात. या संघटना समाजातील आर्थिक,सामाजिक कल्याणकारी कार्य करत असते.

**उद्देश :**

1. बिगर शासकीय संघटनाची संकल्पनाचा अभ्यास करणे
2. बिगर शासकीय संघटनाची कार्यप्रणाली व वैशिष्ट्याचा अभ्यास करणे
3. बिगर शासकीय संघटनाची विकासात्मक भूमिका अभ्यास करणे

**विषय विवेचन :**

बिगर शासकीय संस्था एन.जी.ओ. अर्थात 'नॉन गव्हर्मेंटल ऑर्गनायझेशन' म्हणजे विगर शासकीय संस्था जागतिक बँकेने केलेल्या व्याख्येनुसार 'लोकांचे दुःख कमी करण्यासाठी झटणाऱ्या, गरीबाचे हितरक्षणासाठी व पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी झटणाऱ्या, मूलभूत सामाजिक सेवा पुरवणाऱ्या किंवा सामाजिक विकासाचे कार्य करणाच्या खाजगी संस्था म्हणजे बिगर शासकीय संस्था होत'. तसेच बिगरशासकीय संस्था म्हणजे वैधरित्या स्थापन झालेल्या, शासनापासून अलिप्त राहून कार्य करणाऱ्या आणि सर्व साधारणपणे 'ना नफा ना तोटा' या तत्वावर सार्वजनिक हितासाठी काम करणाऱ्या संस्था होत. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे तसेच त्यातून विकास साधणे आणि मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे विगर शासकीय संस्थांचे प्राथमिक उध्दिष्ट आहे. सर्व साधारणपणे विगर शासकीय संस्थांना अंशतः किंवा पूर्णतः शासनाकडून निधी पुरवठा केला जातो आणि शासकीय प्रतिनिधिना संस्थेबाहेर ठेवून या संस्था आपले बिगर शासकीय स्वरूप राखतात. जागतिक बँकेने बिगर शासकीय संस्थेचे कार्यान्वयन आणि सल्लागार स्वरूपातील संस्था असे दोन प्रकारे वर्गीकरण केले आहे. विकास प्रकल्पांची आंखणी व अंमलबजावणी हे पहिल्या कार्या न्वयन संस्थेचे उध्दिष्ट आहे तर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक स्तरावरील धोरण व पध्दतीवर प्रभाव टाकणे हे सल्लागारी प्रकारातील संस्थेचे उध्दिष्ट आहे. या विगर शासकीय संस्थांचा उदय आंतरराष्ट्रीय स्तरावर १८३९ ला 'रोटरी' या संस्थेच्या स्थापनेने झालेला आहे. मुख्वातीला जागतिक पातळीवर गुलामगिरी, स्त्री हक्क या विषया संवधीत चळवळीतून विविध बिगर शासकीय संग्थांचा विकास झालेला द्विसतो. १९४५ ला संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाल्यानंतर विगर शासकीय संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. या बिगर शासकीय संस्था मानवतावादी तत्त्वे, विकास साह्य, पर्यावरण यासारख्या विषयावर जास्त भर देवू लागल्याने यातूनच त्याची व्याप्ती वाढू लागलेली दिसते जागतिक स्तरावर ॲमनेस्ट इंटरनॅशनल, द एल्डर्स, ग्रीनपीस, डिसएवंल पीपल्स इंटरनैशनल, मेमोरीयल, पाथवेज टू पीस यासारख्या बिगर शासकीय संस्था कार्य करतात.

**बिगर शासकीय संघटनांचे प्रकार:**

बिगर शासकीय संघटनांचे त्यांच्या कार्याविविध प्रकार पाहतात प्रामुख्याने विकभिमुख काम करणान्या संघाना, जनजागृती करावा संघटना प्रभावी नचाच्या सातवाहना, सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना, श्री मुकीच्या क्षेत्रातकाला असे प्रामुख्याने पाच प्रकार पडतात त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे

1. विकासाभिमुख काम करणाऱ्या संघटना
2. जनजागृती करणाऱ्या संघटना
3. प्रभावी नेत्याच्या छायेत वाढणाऱ्या संघटना
4. सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना
5. स्त्री-मुक्तीसाठी कार्य करणाऱ्या संघटना

**बिगर शासकीय संघटनांची ची भूमिका**

**ग्रामीण विकास :**

भारतातील बिगर शासकीय संघटनांनी एकत्रित येऊन एका फेडरेशनची स्थापना केली आहे. या फेडरेशनच्या माध्यमातून या बिगर शासकीय संघटना ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या, प्रश्न व समाज कारणांसंबंधी एकत्रित येऊन चर्चा करतात. या फेडरेशनच्या माध्यमातून सर्व बिगर शासकीय संघटना, की ज्या ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी काम करतात त्या एकमेकांना सहकार्य करतात व एकमेकांबरोबर समन्वय साधून काम करतात. यामध्ये प्रामुख्याने शेती आणि जमीन विकास संबंधीच्या क्रिया, पाणी व्यवस्थापन व्यवस्था (लहान व मध्यम स्वरूपाची), शेतीमध्ये नबीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, शेतीसंबंधीचे शिक्षण, कुटुंब कल्याण आणि आरोग्य, अनुसूचित जाती ब जमातीतील महिलांच्या विकासासाठी प्रयत्न, ग्रामीण भागातील दरिद्री लोकांची माहिती घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन प्रकल्प राबविणे इत्यादी क्षेत्रात योगदान देत आहे.

**दुर्बल घटकांचे पुनर्वसन व विकास :**

सन १८१० मध्ये कलकत्यामध्ये लेप्रसीने ग्रस्त असणाऱ्या लोकांना बिगर शासकीय संघटनांद्वार सर्वप्रथम मदत केली गेली. सन १८२६ मध्ये अंध लोकांसाठी राजा काली शंकर घोसाल यांन ईस्ट इंडिया कंपनीकडून निधी घेऊन त्यांच्यासाठीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. दुर्बल लोकांच्य पुनर्वसन कार्यामध्ये बिगर शासकीय संघटनांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अलिकडच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्था या दुर्बल व्यक्तींच्या सहकार्यासाठी आर्थिक मदत देत आहेत. आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये जागतिक बँक, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना इत्यादी प्रमुख संस्थांचा समावेश होतो.

**स्त्री यांचा विकास :**

एन.जी.ओ. ची भूमिका ही स्त्रियांच्या उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. एन.जी.ओ. द्वारे स्त्रीयांच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी आरोग्य, जाणीवेसंदर्भात, शिक्षणासंदर्भात तसेच त्यांच्या कुटुंबातील दर्जासंदर्भात आज एन.जी.आओं. महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आज महिलांसंबंधी कार्य करणाऱ्या अनेक एन.जी.ओ. द्वारे महिलांसाठी घरे, स्वच्छतेच्या सवयी, आरोग्य सेवा, शिक्षण, पोषण आहार, या सर्व बाबींसंबंधी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी काम करणाऱ्या अनेक एन.जी.ओ. चे ध्येय हे गरिब सत्ताहिन स्त्रियांच्या हितासाठी त्यांच्या विकासासाठी काम करणे हे आहे. स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात काम करणाऱ्या एन.जी.ओ. मध्ये सन १९२७ साली स्थापन झालेली "ऑल इंडिया बुमन कॉन्फरन्स" या संघटनेचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ही संघटना गांधी व पाश्चात्य उदारमतवादी विचारांनी प्रेरित आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रीयांचे कल्याण करणे हे आहे. सध्या या संघटनेचे एक लाख सदस्य व संपूर्ण भारतभर या संघटनेच्या ४०० शाखा आहेत. ही संघटना प्रामुख्याने कुटुबनियोजन, बालकल्याण, स्त्रीयांसाठी आवश्यक असणारी वसतीगृहे आणि अपारंपारिक उर्जा स्त्रोत या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम करीत आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावणे व त्यांची विविध प्रश्नांपासून सोडवणूक करणे हे आहे

**समारोप :**

बिगर शासकीय संघटनांची भूमिका आजा महत्वपूर्ण बनत चालेली आहे. सरकार आणि बिगर शासकीय संघटना एकमेकाला सहकार्य करून समाजाचा विकास करू शकता. या संघटना विविध भागातील लोकांच्या समस्या, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी एकत्रित येऊन त्यावर चर्चा करतात. त्या पद्धतीने कार्य करतात. तसेच एक बिगर शासकीय संघटना (NGO) सरकार आणि सामान्य जनता यांच्यातील संपर्काचे काम करते. जेव्हा काही समस्या सरकारपर्यंत पोहोचत नाहीत किंवा त्यांचे निराकरण केले जात नाही, तेव्हा या समस्या सरकारला सोपवण्यात एनजीओ कार्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. बिगर शासकीय संघटना काही समस्यांकडे स्पष्टपणे पाहते. अशा प्रकारे बिगर शासकीय संघटना सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी, मानवतावादी मदत पुरवण्यासाठी, विकसनशील समुदायांसाठी आणि जगभरातील लोकसंख्येच्या हक्क आणि कल्याणासाठी समर्थन करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**संदर्भसूची :**


1. डॉ. डी. एन. धनागरे संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव.
2. S. N. Pawar, J. B. Ambekar and D. Shrikant NGOs and Development, The Indian Scenario.
3. संस्था नोंदणी अधिनियम, १८६०, श्री. वा. दातार. चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव.
4. दैनिक लोकसत्ता
5. दैनिक सकाळ


**श्री पांडुरंग पंडीत पाटील**